CMYK

जिल्ह्यातील ३४६३५ विद्यार्थी देणार बारावीची परीक्षा; १४ तालुक्यात ११६ परीक्षा केंद्र >> पान 2

सर्व रुग्णालयातील औषधांची नवीन नियमावलीप्रमाणे गुणवत्ता तपासणी- सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर >> पान 3

जैविक कचरा आगीचे डॉक्टर्ससह औषधी विक्रेत्यांना चटके >> पान 4

**सुविचार**

सातत्य हीच यशाची गुरुकिल्ली आहे.



# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 178 ■ शनिवार, दि. 08 फेब्रुवारी 2025 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

हर हर गंगे! अभिनेता स्वप्नील जोशी पोहोचला महाकुंभ मेळ्यात, केलं पवित्र स्नान

आतील पान

# आदर्श राज्याचा वस्तुपाठ छत्रपती शिवाजी महाराजांनी घालून दिला

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन

मध्यवर्ती संग्रहालयात वाघनखे व शिवशस्त्र दालनाचे उदघाटन

ई विदर्भातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी भेट देण्याचे आवाहन

लेझीम, ढोल-ताशे, दिंडी पथकाच्या मिरवणुकीतून मुख्यमंत्र्यांचे स्वागत

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी : जलव्यवस्थापन, पर्यावरण रक्षण, कायदा व सुव्यवस्था, महिलांचे संरक्षण, सर्व जातीधर्मांचा सन्मान असा आदर्श वस्तुपाठ छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्यकारभाराच्या माध्यमातून दिला आहे. हा समृद्ध वारसा जपण्यासह तो नव्या पिढीपर्यंत प्रवाहित होण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.**



मध्यवर्ती संग्रहालयात शिवकालीन शस्त्रांच्या प्रदर्शनाच्या उद्घाटनानंतर कविवर्य सुरेश भट सभागृह येथे आयोजित मुख्य कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशीष शेलार, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्र्यांचे तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रभारी विभागीय आयुक्त माधवी खोडे, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, पोस्ट मास्टर जनरल (नागपूर परिक्षेत्र) शोभा मधाळे, मुधोजीराजे भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

छत्रपती शिवरायांनी स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी ज्या वाघनखाचा वापर केला होता ती वाघनखे मोठ्या प्रयत्नानंतर आपण आणली आहेत. सुरुवातीला साताऱ्याच्या संग्रहालयामध्ये ही वाघनखे ठेवण्यात आली. महाराष्ट्राला मिळालेल्या या शौर्याच्या वारशाची अनुभूती पश्र्चिम महाराष्ट्रातील हजारो तरुणांनी, विद्यार्थ्यांनी, नागरिकांनी घेतली. ही अनुभूती घेण्याची संधी विदर्भातील युवकांना, जनतेला मिळाली असून याचा अधिकाधिक लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा यासाठी संबधित विभागाने नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले.

महाराष्ट्रावर ज्यावेळी आक्रमणे झाली त्याकाळी आपले संस्कार, आपली संस्कृती, स्वभाषा, स्वधर्म हा जिवंत राहील की नाही अशा प्रकारची अवस्था होती. मात्र शिवरायांनी हे स्वातंत्र्य अबाधित ठेवले. आज आपण जे स्वातंत्र्य उपभोगतो आहोत त्या स्वातंत्र्याची पायाभरणी छत्रपती शिवरायांनी केली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सांस्कृतिक कार्यमंत्री ड. आशिष शेलार म्हणाले, राज्याचा गौरवशाली इतिहास सर्वसामान्यापर्यंत पोहोचविण्यावर सांस्कृतिक कार्य विभागाचा भर आहे. त्यातीलच वाघनखांचे प्रदर्शन हा एक भाग आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत नेण्याचा हा प्रयत्न आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे 'विरासत से विकास' हे ध्येय डोळ्यासमोर ठेवून वाटचाल सुरू असल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री ड.शेलार यांनी सांगितले.

या कार्यक्रमात शिवकालीन शस्त्रे या माहिती पुस्तिकेचे तसेच वाघनखावर आधारित विशेष टपाल तिकीटाचे अनावरण करण्यात आले.

प्रास्ताविक मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले. सूत्रसंचालन प्रसाद ओक यांनी केले तर आभार पुरातत्व व वस्तूसंग्रहालय संचालनालयाचे संचालक तेजस गर्गे यांनी मानले.

मध्यवर्ती संग्रहालयात वाघनखे व शिवशस्त्र दालनाचे शानदार उदघाटन

मध्यवर्ती संग्रहालयात वाघनखे व शिवशस्त्र दालनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशीष शेलार, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, प्रभारी विभागीय आयुक्त माधवी खोडे, मनपा आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, मुधोजीराजे भोसले आदी मान्यवर उपस्थित होते.

शिवकालीन इतिहासाचा साक्षीदार होण्याची नागपूरकरांना ही अपूर्व संधी मिळाली आहे. वाघनखे ही महाराष्ट्राच्या शौर्याचा मनबिंदू आहे. स्वराजाच्या रक्षणासाठी वाघनखांचा चपखल वापर छत्रपती शिवाजी महाराजांनी केला. माजी सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार व अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी प्रयत्नपूर्वक ही वाघनखे महाराष्ट्रात आणली आहेत. महाराष्ट्रातील हजारो युवक या शिवशस्त्र शौर्य प्रदर्शनातून प्रेरणा घेतील, असा विश्र्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. मराठाकालीन शस्त्रास्त्रे, वाघनखे याची त्यांनी पाहणी केली. या ठिकाणी साहसी मर्दानीखेळ, चर्चासत्र, व्याख्याने यानिमित्ताने आयोजित केले जातील असे त्यांनी सांगितले.

## काँग्रेसच्या माजी आमदाराला अटक, अजिंठा बॅंक गैरव्यवहार प्रकरणात मोठी कारवाई

दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** अजिंठा बँक गैरव्यवहार प्रकरणी काँग्रेसचे माजी आमदार सुभाष झांबड यांना पोलिसांनी अटक केली आहे. गेल्या काही महिन्यांपासून पोलिसांकडून त्यांचा शोध घेण्यात येत होता. आज त्यांना पोलिसांनी अटक केली आहे. २१ जानेवारी रोजी न्यायालयाने त्यांचा जामीन अर्ज फेटाळला होता तेव्हापासूनच अटक होण्याची शक्यता वर्तवण्यात येत होती. आज अखेर सुभाष झांबड यांना अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे.काँग्रेसचे माजी आमदार सुभाष झांबड अझिंठा अर्बन बँकेचे अध्यक्ष असून बॅंकेमधील ९८ कोटी ४८ लाख व २१ कोटी रूपयाच्या घोटाळा प्रकरणात त्यांच्यावर सीटीचौक पोलिस ठाण्यात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल आहेत.

पहिला गुन्हा हा ऑक्टोबर २०२३ मध्ये दाखल असून दुसरा गुन्हा हा नोव्हेंबर २०२४ मध्ये नोंदवण्यात आला आहे. दरम्यान पहिला गुन्हा दाखल झाल्यापासून सुभाष झांबड अटकपूर्व जामीनासाठी प्रयत्न करत आहेत. यापुर्वी जिल्हा व सत्र न्यायालय आणि औरंगबाद खंडपीठात झांबड यांचा अटकपूर्व जामीनअर्ज फेटाळण्यात आला होता. त्यानंतर झांबड यांनी सर्वो च्च न्यायालयात धाव घेतली होती. तेथे त्याच्या अर्जाच्या सुनावणीच्या वेळी झांबड पोलिसांसमोर हजर झाले आणि पुन्हा जामीनासाठी अर्ज केल्यास त्यावर न्यायालयाने तत्काळ निर्णय घ्यावा,असे आदेश देण्यात आले आहेत.

## भरधाव दुचाकी उड्डान पुलाच्या भिंतीला धडकली; एकाचा मृत्यू, दोघे जखमी

दैनिक आपला विदर्भ

■ मनोज गोरे



**चंद्रपूर :** टिबल सीट असलेली भरधाव दुचाकी उडान पुलाच्या भिंतीला जोरदार धडकल्याने झालेल्या अपघातात एका युवकाचा घटनास्थळीत मृत्यू झाला असून दोघे युवक गंभीर जखमी झाले आहे. सदर घटना दिनांक ५ रोज बुधवार ला रात्रो अकरा वाजता शहरातील हायवे वरील उडान पुलाजवळ घडली. जखमी दोन्ही युवकांना चंद्रपूर येथील सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून दोघांची प्रकृती गंभीर आहे. अमोल भिंगारदिवे वय २२ वर्ष,सुजल बहादे व लहू धोटे हे तीन युवक नंबर प्लेट नसलेल्या एका काळ्या रंगाच्या पल्सर दुचाकीने शहरातील पंचशील नगरातून हायवे कडे भरधाव वेगाने जात असताना सदर दुचाकी उडान पुलाच्या भिंतीला आदळली. या अपघातात अमोल भिंगारदिवे या युवकाचा घटनास्थळीच मृत्यू झाला तर सुजल बहादे व लहू धोटे हे दोघे गंभीर जखमी झाले आहे. त्यांना उपचारासाठी चंद्रपूर येथील सामान्य रुग्णालय चंद्रपूर येथे दाखल करण्यात आले,मृतकलाग्रामीण रुग्णालय भद्रावती येथे, शव विच्छेदन साठी पाठवण्यात आले. घटनेचा पुढील तपास भद्रावती पोलीस करीत आहे.

# ऐकावे ते नवलच पहिली योजना अर्धवट पुन्हा वीस कोटीच्या निधीची तरतूद

## डोणगाव येथील प्रकार : जलजीवन मिशनची योजना ठरतंय कुरण

दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/प्रतिनिधी : नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा व्हावा, यासाठी केंद्र शासनाच्या वतीने कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च करून पाण्याची व्यवस्था केली जात आहे. असे असताना मात्र, डोणगाव ग्रामपंचायतमध्ये पाणीपुरवठा योजनाही अधिकारी पदाधिकाऱ्यासाठी भ्रष्टाचाराचे कुरण बनले.? डोणगाव ग्रामपंचायत मधील वाड क्रमांक ६ असलेल्या कऱ्हाडवाडी मध्ये जल जीवन मिशन अंतर्गत ९५ लाखा ४२ लक्ष रुपयांची योजना मंजूर होऊन तिचे २७ टक्के काम सुद्धा झाले मात्र. आता ते काम बंद आहे त्यामुळे या योजनेचे पुढे काय प्रश्न कायम असतांनाही. आता जलजीवन मिशन अंतर्गत डोणगाव ग्रामपंचायतसाठी तब्बल २० कोटी ९८ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे पहिलेच काम अर्धवट आणि पुन्हा कोट्यावधी रुपयाची तरतूद केल्याने हे काम पूर्णत्वास जाईल का असा प्रश्न नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे.**



भाग ०७

डोणगाव ग्रामपंचायत लोकसंख्येच्या तुलनेत जिल्ह्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत आहे. राजकीय दृष्ट्या हे गाव महत्त्वाचे आहे. छत्रपती संभाजीनगर ते नागपूर हायवेवर हे गाव असल्याने गावाचा विस्तार झपाट्याने होत आहे. नागरिकांना सोयीसुविधा मिळाव्या, यासाठी शासन कोट्यावधी रुपयाचा निधी खर्च करत आहे. मात्र, अधिकारी पदाधिकाऱ्यांच्या भ्रष्टवृत्तीमुळे हा पूर्ण निधी पाण्यात जात असल्याचे चित्र डोणगाव ग्रामपंचायत मध्ये आतापर्यंत दिसून येते आहे. गत दहा वर्षांपूर्वी राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत डोणगाववासीयांना पाणीपुरवठा करण्यासाठी तब्बल कोटींचा निधी खर्च करण्यात आला. या कोटींच्या निधीतून करण्यात आलेले काम अद्याप पर्ण झाले नाही. तर, डोणगाव ग्रामपंचायतचा वार्ड क्रमांक सहा असलेल्या कऱ्हाडवाडी भागात पाणीपुरवठा करण्यासाठी तब्बल ९५ लाखाच्यावर रुपयांचा निधी मंजूर होऊन जल जीवन मिशन पाणीपुरवठा योजना सुरू केली. मात्र, सदर पाणीपुरवठा योजना पूर्णत्वास न गेल्याने हा कोट्यावधीचा नीधी व ही योजना पाण्यात जाते की काय असा प्रश्र्न.?, पुन्हा डोणगाव ग्रामपंचायत साठीच शासनाने जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा करण्यासाठी आता तब्बल २० कोटी ९८ लाख रुपयाचा निधीची तरतूद केली आहे. मात्र, पहिलेच काम पूर्ण आणि त्यावर पुन्हा तब्बल २० कोटीचा निधीचा खर्चाची तरतूद केली आहे.यामुळे हा २० कोटीचा निधी ही पाण्यात जातो की काय असा प्रश्र्न पुन्हा निर्माण झाला आहे. डोणगाव ग्रामपंचायत चे ग्रामविकास अधिकारी दिलीप ताबांरे यांनी राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत झालेल्या कामांमध्ये तब्बल ११ कोटीचा खर्च करण्यात झाला असल्याची माहिती दिली आहे. मात्र, प्रत्यक्षात या निधीतून करण्यात आलेले कामे पूर्ण न झाल्याने व याचा नागरिकांना कोणताही लाभ न झाल्याने शासनाच्या योजना ह्या केवळ अधिकारी पदाधिकारी यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी राबविल्या जातात की काय असा प्रश्र्न जनतेकडून उपस्थित केला जात आहे. सुरुवातीच्या योजना अपूर्ण असताना पुन्हा नवीन योजनांवर खर्च करून शासनाला काय साध्य करायचे असा प्रश्र्नही या निमित्ताने उपस्थित होत आहे. कोट्यावधी रुपयाचा खर्च झाल्यानंतर सदर काम पूर्ण न झाल्यास याला संबंधित अधिकारी व कंत्राटदार दोषी राहत असल्याने त्यांच्यावर कारवाई करण्याची गरज असताना टक्केवारीच्या खेळात मात्र शासनाचा कोट्यावधी रुपयाचा निधी चुराडा केला जात असल्याचे चित्र डोणगाव ग्रामपंचायतमध्ये दिसून येत आहे.



देविदास खनपटे
मुख्य संपादक

## मुलांच्या भांडणात मोठ्यांची एंट्री, ११ जण झाले जखमी

पाटणा : बिहारच्या नवादा येथे मुलांच्या भांडणात मोठ्यांनी हस्तक्षेप केला आणि त्याचे परिणाम वाईट झाले. दोन्ही कुटुंबादरम्यान चांगलाच वाद वाढला आणि या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. या हाणामारीत दोन्ही कुटुंबातील ११ जण जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी या घटनेतील जखमींना रुग्णालयात दाखल केले. ही घटना कादिरगंज येथे घडली. येथे काही लहान मुलांमध्ये बाचाबाची झाली. या लढाईत मोठ्यांनी भाग घेतला. त्यांच्यातही वाद सुरू झाला. लाठ्या-काठ्या, विटा, दगड यांनी मारामारी सुरू झाली. या हाणामारीत दोन्ही कुटुंबातील महिलांसह ११ जण जखमी झाले. जखमींमध्ये एका कुटुंबातील ७ जण तर दुसऱ्या कुटुंबातील ४ जण जखमी झाले आहेत. या जखमींना जवळच्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी संध्याकाळी पौरा गावात सरस्वतीच्या मूर्तीच्या विसर्जनादरम्यान या दोन्ही कुटुंबातील मुलांमध्ये बाचाबाची झाली. यावरून वाद झाला होता. तेथील लोकांनी हा वाद मिटवला होता. याबाबत पंचायतही भरवण्यात आली आणि प्रकरण संपवण्यात आले. मात्र त्यानंतर एका कुटुंबातील लोकांनी दुसऱ्या कुटुंबावर हल्ला केला. जखमींमध्ये एका कुटुंबातील पौरा गावाचे निवासी सोमर चौधरींचे पुत्र गौरे चौधरी, दिनेश चौधरी, छोटू कुमार, शौरभ कुमार, बाले चौधरींचा पुत्र सुरेंद्र कुमार, सोनरवा देवी, दिव्यांशी कुमारी जखमी झाले आहेत. यातील गोरे चौधरी यांची स्थिती गंभीर आहे. तर दुसऱ्या कुटुंबातील पौरा गावाचे निवासी मेवा लाल यांचे पुत्र संजय राम, दीपक सिंह यांचे पुत्र कुंदन कुमार, गौतम सिंह आणि पंकज कुमार हे जखमी झालेत.

CMYK

## क्रीडाविश्वाचा ज्ञानकोष हरपला

ज्यांचे क्रीडा विषयक लेख वाचत मी लहानाचा मोठा झालो. ज्यांच्या लेखाने माझे क्रिकेट विश्र्वातील ज्ञान वृद्धिंगत झाले. ज्यांच्या लेखणीतून प्रेरणा घेऊन मी क्रीडा विषयक लेख लिहू लागलो असे ज्येष्ठ क्रीडा समीक्षक, लेखक, स्तंभलेखक द्वारकानाथ संझगिरी यांचे वयाच्या ७४ व्या वर्षी गुरुवारी ( ६ फेब्रुवारी ) रोजी निधन झाले. त्यांच्या निधनाने कोट्यवधी क्रिकेट रसिकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारा क्रीडाविश्र्वाचा चालता बोलता ज्ञानकोष हरपला. गेल्या काही दिवसांपासून ते आजारी होते त्या संदर्भात त्यांनी एक फेसबुक पोस्ट देखील लिहिली होती मात्र ते असे इतक्या लवकर जातील असे वाटले नव्हते. शालेय जीवनात असतानाच द्वारकानाथ संझगिरी हे नाव तोंडपाठ झाले होते. भारतीय संघाचा क्रिकेट सामना असला की त्या दिवशी सकाळी आणि क्रिकेट सामना संपल्यानंतर दुसऱ्या दिवशी सामन्यावर विश्र्लेषण करणारे वर्तमानपत्रातील त्यांचे लेख वाचणे हा माझा आवडता उद्योग. त्यांचे क्रिकेट वरील ज्ञान तर अफलातूनच होते. सध्याच्या क्रिकेटवर भाष्य करतानाच ते आपल्याला भूतकाळात घेऊन जात अगदी पन्नास वर्षांपूर्वीच्या सामन्याचा किंवा खेळाडूंचा संदर्भ त्यांच्या लेखात असे. त्यांचा इतके क्रिकेटचे ज्ञान असलेले लेखक विरळच. केवळ वर्तमानपत्रातच नाही तर दूरचित्रवाणीवर देखील ते क्रिकेटचे समीक्षण करत. जवळपास पाच दशके क्रिकेटवर लेखन करून क्रिकेटप्रेमींना नवी दृष्टी देणाऱ्या द्वारकानाथ संझगिरी यांचा जन्म १५ नोव्हेंबर १९५० रोजी मुंबईतील दादर येथे झाला. मुंबईत शालेय शिक्षण घेतल्यावर त्यांनी माटुंग्याच्या व्हिक्टोरिया ज्युबली कॉलेजमधून इंजिनीरिंगचे शिक्षण पूर्ण केले. इंजीअरिंग केल्यावर त्यांनी मुंबई महपालिकेत अभियंता म्हणून नोकरीही केली पण क्रिकेट व साहित्यातील रूचीमुळे त्यांच्यातील क्रिकेट समीक्षक घडवला. क्रिकेटवर त्यांनी केलेले लेखन विविध वर्तमानपत्रातून प्रसिद्ध होऊ लागले. त्यांच्या लिखाणाला क्रिकेटप्रेमींनी नेहमीच पसंतीची दाद दिली. केवळ मराठीच नाही तर इंग्रजी आणि हिंदी दैनिकातून आणि साप्ताहिकातूनही ते लिहू लागले. त्यांनी अनेक क्रीडापटुंच्या मुलाखती घेतल्या. क्रीडापटुंची मुलाखत घेण्याची त्यांची एक विशिष्ट शैली होती. ते क्रीडापटुंची मुलाखत घेत आहेत असे वाटतच नव्हते त्यांची मुलखात म्हणजे गप्पांचा कार्यक्रमच वाटत असे इतके मनमोकळेपणे क्रीडापटू त्यांच्यापुढे व्यक्त होत. केवळ क्रिकेट किंवा क्रीडाविषयकच नव्हे तर चित्रपट, प्रवास, पर्यटन आणि सामाजिक विषयांवर देखील त्यांनी विपुल लेखन केले . द्वारकानाथ संझगिरी यांनी १९८३ पासून २०११ पर्यंत झालेल्या सर्व क्रिकेटच्या विश्र्वचषकांचे त्या देशात जाऊन वार्तांकन केले. द्वारकानाथ संझगिरी यांनी क्रिकेटर्स आणि चित्रपट तारे तारकांवर अनेक कार्यक्रम केले. त्या कार्यक्रमाच्या निवेदनाची धुरा तेच सांभाळीत. द्वारकानाथ संझगिरी यांनी जवळपास ५० पुस्तके लिहिली. त्यातील शतकात एकच सचिन, चिरंजीव सचिन, दिलखुलास बातचीत क्रिकेटपटूंशी, खेलंदाजी, बोलंदाजी, चॅम्पियन्स, चित्तवेधक विश्र्वचषक २०२३, क्रिकेट कॉकटेल, क्रिकेट वर्ल्डकप हाय लाईट, कथा विश्र्वचषकाच्या, लंडन ऑलिम्पिक, पॉवर प्ले, स्टंप व्हिजन, संवाद लिजेंडशी, क्रिकेट गाथा, थर्ड अंपायर, इंग्लिश ब्रेकफास्ट ही त्यांची पुस्तके क्रीडाप्रेमींना खूप आवडली. द्वारकानाथ संझगिरी यांना अनेक पुरस्कार मिळाले त्यात दत्ता हलसगीकर साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र सरकारचा साहित्य पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य संघाचा उत्कृष्ट लेखक पुरस्कार, विद्याधर गोखले साहित्य पुरस्कार, क्रीडाविषयक लेखनासाठी विश्र्वनाथ वाबळे पुरस्कार, वृत्तपत्र लेखन संघाचा पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले. त्यांच्या निधनाने क्रीडाविश्र्वासह साहित्य क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांचे विविधांगी लेखन कायम स्मरणात राहील. स्तंभलेखक, समीक्षक द्वारकानाथ संझगिरी यांना भावपूर्ण श्रद्धांजली !

# जिल्ह्यातील ३४६३५ विद्यार्थी देणार बारावीची परीक्षा; १४ तालुक्यात ११६ परीक्षा केंद्र


दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी :** उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेला ११ फेब्रुवारीपासून प्रारंभ होणार असून १८ मार्चपर्यंत सदर परीक्षा संपन्न होणार आहे बुलढाणा जिल्ह्यात एकूण ३४ हजार ६३५ विद्यार्थी १६ तालुक्यातील ११६ परीक्षा केंद्रावर परीक्षा देणार आहेत सदर परीक्षा ही कॉपीमुक्त वातावरणात पार पडावी, यासाठी शिक्षण विभागाने संपूर्ण नियोजन केले आहे त्याचबरोबर परीक्षा केंद्रांवर भरारी पथकाची सद्धा नजर राहणार आहे.

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १२ वी) ११ फेब्रुवारीपासून सुरू होत आहे.सदर परीक्षा १८ मार्च दरम्यान होत आहे. जिल्ह्यातील १४ तालुक्यात ११६ परीक्षा केंद्रावर ३४ हजार ६३५ विद्यार्थी परीक्षा देणार आहे. सदर परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडावी यासाठी शिक्षण विभागाच्या वतीने जयत तयारी केली आहे त्याचबरोबर विविध विभागाचे भरारी पथके नियुक्त करण्यात आले आहेत.तसेच माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इयत्ता १० वी) २१ फेब्रुवारी पासून सुरू होणार असून १७ मार्च दरम्यान घेण्यात येणार आहे. १५९ परीक्षा केंद्रावर एकूण ४०१९४ विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. सदर परीक्षा ही कॉपीमुक्त वातावरणात पार पडावे कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालय, दक्षता पथक, मुख्य कार्यकारी अधिकारी, दक्षता पथक, पोलीस अधीक्षक, दक्षता पथक, प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण कार्यालय, शिक्षणाधिकारी (माध्यमिक), शिक्षणाधिकारी (योजना), शिक्षणाधिकारी (प्राथमिक), उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) आदी पथकाच्या माध्यमातून परीक्षा केंद्रावर नजर ठेवण्यात येणार आ हे.

### जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली दक्षता समितीची सभा संपन्न

जिल्हा दक्षता समिती सभा जिल्हाधिकारी, तथा अध्यक्ष दक्षता समिती बुलडाणा यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सदर सभेत कॉपी मुक्त अभियान व गैरमार्गाशी लढा या संदर्भात सर्व मुख्याध्यापकांना परीक्षा शांततेत पार पडेल. या बाबत सूचना देण्यात आल्यात. तसेच वेळोवेळी झालेल्या मुख्याध्यापकांच्या सभेत देखील परीक्षेसंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत असे सदस्य-सचिव यांनी सांगितले.



### अनुचित प्रकार घडू नये म्हणून आठ भरारी पथक नियुक्त

बुलढाणा जिल्ह्यातील ११६ केंद्रात ३४ हजार ६३५ विद्यार्थी इयत्ता १२ वीची परीक्षा देणार आहेत. या केंद्रातील शिक्षकच पेपर घेणार आहेत. इयत्ता बारावीची परीक्षा ११ फेब्रुवारी ते १८ मार्च दरम्यान पार पडणार आहे. परीक्षेदरम्यान गैरप्रकार रोखण्यासाठी शिक्षण विभागाकडून कॉपिमुक्त अभियान राबविले जात असून, त्यासाठी ८ भरारी पथकाची नियुक्ती केली आहे. तसेच महसूल विभागाचे प्रत्येक तालुक्यात एक पथक कार्यरत राहणार आहे. त्याचप्रमाणे अतिरिक्त बैठे पथकेही स्थापन करण्यात येणार आहेत.

**- आशिष वाघ,**
**उपशिक्षणाधिकारी माध्यमिक बुलढाणा**

# बर्ड फ्लूने एकच खळबळ, नागपुरातील हजारो कोंबड्या अन् खाद्य केल नष्ट; प्रशासन सतर्क

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** नागपूर शहरातून बर्ड फ्लू संदर्भात एक मोठी माहिती पुढे आली आहे. शहरातील ताजबाग येथील यासीन प्लॉट परिसरात तीन कोंबड्यांचा मृत्यू बर्डफ्लू मुळे झाल्याचे निष्पन्न झाल्यानंतर महापालिकेच्या आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून परिसरातील ३ हजार ५४ कोंबड्या नियमानुसार मारून जमिनीत पूरल्या आहेत. तर त्यांचे एक हजार किलो पेक्षा जास्त खाद्यही नष्ट केले आहे. दुसरीकडे बर्ड फ्लुमुळे मृत्यू पावलेल्या कोंबड्यांच्या संपर्कात आलेल्यांना ऊरस्न्षत्ल च्या औषधी दिल्या जात आहे.



पुढे आलेल्या माहितीनुसार, ताजबाग परिसरातील यासीन प्लॉट भागात एका चिकन सेंटर मधील तीन कोंबड्यांचा ३१ जानेवारी रोजी अचानक मृत्यू झाला होता. त्यानंतर बर्ड फ्लूच्या संशयाने पशुसंवर्धन विभागाने त्यांचे नमुने भोपाळ येथील राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशुरोग प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले होते. दोन दिवसापूर्वी तिथून आलेल्या अहवालात ताजबाग परिसरातील कोंबड्यांचा मृत्यू बर्ड फ्लूमुळे झाल्याचे निष्पन्न झाले होते.

परिसरातील ३ हजार ५४ कोंबड्या मारल्या

त्यानंतर नियमानुसार पशुसंवर्धन विभागाने यासीन प्लॉटच्या अवतीभवतीचा एक किलोमीटर चा परिसर प्रतिबंधात्मक क्षेत्र म्हणून जाहीर केला होता. त्यानंतर महापालिकेच्या आरोग्य विभागाने बर्ड फ्लू च्या नियमानुसार त्या परिसरातील ३ हजार ५४ कोंबड्या मारल्या आहे. तर महापालिकेच्या आरोग्य विभागाने प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून संपूर्ण परिसरात निर्जतुकीकरण केलंय. मात्र नागपूर शहरातून बर्ड फ्लूचा शहरात शिरकाव झाल्याने एकच खळबळ उडाली आहे.

विदर्भ राज्य आंदोलन समितीचे दुसरे अधिवेशन नागपुरात

विदर्भ राज्य आंदोलन समितीच्या नागपूर मुख्यालयात २३ आणि २४ फेब्रुवारी रोजी दुसरे अधिवेशन होणार आहे. २४ मार्चला दुपारनंतर खुले अधिवेशन होणार असून १२० तालुक्यांचे प्रतिनिधी व पदाधिकारी या अधिवेशनाला हजार राहणार असल्याची माहिती पुढे आली आहे. या अधिवेशनात विदर्भातील प्रश्न, अनुशेष यावर चर्चा तसेच विदर्भाचे स्वतंत्र राज्य व्हावे यासाठी सर्व पार्श्र्वभुमी, सर्व तज्ज्ञ मार्गदर्शक मांडणार आहेत. प्रसिध्द अर्थतज्ञ डॉ. श्रीनिवास खांदेवाले विदर्भाचा अर्थसंकल्प सादर करून जनते समोर मांडणार असल्याची माहितीही पुढे आले आहे. या अधिवेशनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन विदर्भ राज्य आंदोलन समितीने केले आहे.

### छत्रपतींबद्दल वादग्रस्त वक्तव्य करून महाराष्ट्र अशांत करण्याचा कट - भोसले

**सातारा/प्रतिनिधी :** ''छत्रपती शिवाजी महाराज यांना आग्र्यातून सुटण्यासाठी 'पेटारे-बिटारे असं काहीच नव्हतं, छत्रपती शिवाजी महाराज औरंगजेबाच्या अनेक सरदारांना लाच देऊन आग्र्याहून सुटून महाराष्ट्रात परतले'', असा दावा अभिनेते राहुल सोलापूरकर यांनी केला होता. या विधानावर चौफेर टीका झाल्यानंतर आता राहुल सोलापूरकर यांनी दिलगिरी व्यक्त केलीय. मात्र, त्यांच्याविरोधात राज्यात ठिकठिकाणी आंदोलनं करण्यात येत आहेत. तर याप्रकरणी आता सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांनी प्रतिक्रिया दिलीय.

या संदर्भात प्रसार माध्यमांशी संवाद साधताना शिवेंद्रराजे भोसले म्हणाले, ''राहुल सोलापूरकरांनी कोणत्या हेतूनं वक्तव्य केलं, त्याच्या खोलात सरकारनं गेलं पाहिजे. या माध्यमातून महाराष्ट्रात अशांतता पसरवण्याचा डाव आहे का? हेही सरकारनं तपासलं पाहिजे. वादग्रस्त बोलायचं आणि राज्य अशांत करायचं, हा खेळ चाललेला आहे, असं मला तरी वाटतं,'' असा संशय शिवेंद्रराजे यांनी व्यक्त केलाय. पुढं ते म्हणाले, ''कलाकार असल्यानं आम्हाला समजातलं सगळं कळतं, असं त्यांना वाटतं. तुम्हाला जर सगळं कळत असतं तर तुम्ही छत्रपतींच्या बाबतीत चुकीच्या पद्धतीनं आणि इतिहासाबद्दल एवढ्या बिनधास्तपणे बोलला नसता'', असा संताप त्यांनी व्यक्त केला. तसंच सोलापूरकरांनी माफी मागितली असली तरी त्याचा काही उपयोग नाही. सरकारनं त्यांच्यावर ताबडतोब कडक कारवाई करावी, अशी मागणीही शिवेंद्रराजेंनी केलीय.

# हर हर गंगे! अभिनेता स्वप्नील जोशी पोहोचला महाकुंभ मेळ्यात, केलं पवित्र स्नान

**मुंबई/प्रतिनिधी :** महाकुंभ मेळा हिंदू पौराणिक धर्मानुसार खूप महत्त्वाचा आहे. हा जगातील सर्वात मोठा सार्वजनिक मेळावा आहे ज्यामध्ये तपस्वी, संत, साधू, साध्वी, कल्पवासी आणि सर्व स्तरातील लोक एकत्र येतात. सेलिब्रिटीही या महाकुंभात सहभागी होत आहेत. नुकताच मराठमोळा अभिनेता स्वप्नील जोशी महाकुंभात पोहोचला. व्हिडिओ शेअर करत त्याने याची माहिती दिली.

प्रयागराज येथे सुरू असलेला महाकुंभ मेळा भारतासह जगभरातील लोकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरतोय आणि जगभरातील भक्तांनी या महाकुंभ मेळ्यात खास हजेरी देखील लावली आहे. हिंदू धर्मात पवित्र मानल्या जाणाऱ्या महाकुंभ मेळ्यात निर्माता-अभिनेता स्वप्नील जोशीने जाऊन पवित्र स्नान करून आशीर्वाद घेतले आहेत. स्वप्नील हा कायम वेगवेगळ्या देवस्थानांना भेट देताना दिसतो.

स्वप्नीलने त्याच्या सोशल मीडियावरून या महाकुंभ मेळ्याची खास झलक प्रेक्षकांना दाखवली आहे. त्रिवेणी संगम येथे जाऊन स्वप्नीलने खास स्नान तर केलं पण भक्तिमय वातावरणात सुरू असलेल्या या खास सोहळ्याची झलक त्याने या व्हिडिओमधून दाखवली आहे.

स्वप्नील जोशी पोस्ट

स्वप्नील जोशी पोस्ट शेअर करत म्हणाला, महाकुंभ २०२५ आयुष्यातील सर्वात अविस्मरणीय अनुभव! प्रयागराजमध्ये महाकुंभ २०२५ ला उपस्थित राहण्याचा आणि महासंगमात पवित्र स्नान करण्याचा योग आला. हा दिव्य प्रवास अनुभवण्याचे भाग्य लाभले, यासाठी माझ्या भावाला सौरभ गाडगील आणि त्यांच्या परिवाराला धन्यवाद!

स्वप्निल पुढे म्हणाला, कुटुंब आणि प्रियजनांसाठी प्रार्थना केली, सकारात्मक ऊर्जा आत्मसात केली, डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले! या अद्भुत महाकुंभाचे साक्षीदार होण्याचा सन्मान मिळणं, हा दैवी आशीर्वाद वाटतो- हा सनातन धर्म, मानवता, प्रेम आणि भक्तीचा सर्वात मोठा उत्सव! या क्षणाची अनुभूती शब्दांत मांडता येणार नाही-खरंच दिव्य अनुभव!

# उद्धव गट आणखी फुटणार, ऑपरेशन टायगर जोरात

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** उद्धव ठाकरे गट आणि महाविकास आघाडीत आणखी मोठी फूट पडेल. पुढील ९० दिवसांत टप्प्याटप्प्याने १० - १२ आमदार उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश करतील, असे राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत म्हणाले. लवकरच उद्धव ठाकरे गटाचे लोकसभेतील किमान सहा खासदार शिवसेनेत प्रवेश करतील, अशीही चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.



महाराष्ट्रातून उद्धव ठाकरे गटाचे नऊ खासदार लोकसभेवर आणि २० आमदार विधानसभेवर निवडून गेले आहेत. यामुळे उद्धव गटाचे लोकसभेतील किमान सहा खासदार आणि विधानसभेतील किमान १४ आमदार एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेत प्रवेश करत असल्यास त्यांच्या विरोधात पक्षांतर बंदी कायद्यांतर्गत कारवाई करता येणार नाही, असे तज्ज्ञांचे मत आहे. जर लोकप्रतिनिधी टप्प्याटप्प्याने प्रवेश करणार असतील तर त्यांना राजीनामा देऊन आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेच्या तिकिटावर पोटनिवडणुकीद्वारे पुन्हा निवडून येऊन स्वत:ची स्थिती मजबूत करता येईल. या दोन पैकी कोणताही पर्याय वापरुन लोकप्रतिनिधींनी उद्धव ठाकरे गटातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला तर तो मविआसाठी घातक ठरणार आहे. राज्यात मविआचे मर्यादीत संख्याबळ आहे. यामुळे उद्धव गट फुटल्यास राज्यातील मविआ आणि राष्ट्रीय राजकारणात कॉंग्रेसच्या नेतृत्वातील इंडी आघाडी कमकुवत होण्याचा आणि उद्धव ठाकरे यांच्या राजकीय अस्तित्वापुढे प्रश्न निर्माण होण्याचाही धोका आहे. संसदेत वक्फ बोर्ड विधेयक, समान नागरी कायदा, एक देश - एक निवडणूक कायदा असे कायदे मंजुरीसाठी सादर होतील त्यावेळी विरोधकांची ताकद एकदम क्षीण झाली असल्यास त्याचा फायदा सत्ताधाऱ्यांना होणार आहे. यामुळे उद्धव गटात काय घडते याकडे अनेकांचे लक्ष आहे.

उद्धव ठाकरे गटाचे लोकसभेतील खासदार

अरविंद सावंत, दक्षिण मुंबई
संजय देशमुख, यवतमाळ - वाशिम
नागेश पाटील - आष्टीकर - हिंगोली
संजय जाधव - परभणी
राजाभाऊ वाजे - नाशिक
संजय दिना पाटील - ईशान्य मुंबई
भाऊसाहेब वाकचौरे - शिर्डी
अनिल देसाई - दक्षिण मध्य मुंबई
ओमप्रकाश राजेनिंबाळकर - धाराशिव (उस्मानाबाद)

उद्धव ठाकरे गटाचे विधानसभेतील आमदार

नितीन देशमुख, बाळापूर
मनोज जामसुतकर, भायखळा
अनंत नर, जोगेश्वरी पूर्व
सिद्धार्थ खरात, मेहकर
अजय चौधरी, शिवडी
आदित्य ठाकरे, वरळी
दिलीप सोपल, बार्शी
गजानन लवाटे, दर्यापूर
भास्कर जाधव, गुहागर
महेश सावंत, माहीम
कैलास घाडगे पाटील, धाराशिव (उस्मानाबाद)
डॉ. राहुल पाटील, परभणी
प्रवीण स्वामी, उमरगा
सुनील राऊत, विक्रोळी
सुनील प्रभू, दिंडोशी
बाबाजी काळे, खेड आळंदी
संजय देरकर, वणी
संजय पोतनीस, कलिना
वरुण सरदेसाई, वांद्रे पूर्व
हारुन खान, वर्सोवा

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

## संक्षिप्त...

### शक्तीपीठ रद्दसाठी शेतकऱ्यांनी स्वतःच्या रक्तांनी लिहिलं मुख्यमंत्र्यांना पत्र



दैनिक आपला विदर्भ

**सांगली/प्रतिनिधी :** नागपूर –गोवा शक्तीपीठ महामार्गाचे विरोधात सांगलीतल्या शेतकऱ्यांनी थेट मुख्यमंत्र्यांना स्वतःच्या रक्ताने पत्र लिहिले आहे.शक्तीपीठ महामार्गासाठी होणारी जमीन सर्व्हे प्रक्रिया त्वरित थांबवावी, सांगली जिल्ह्यातून जाणारा शक्तीपीठ महामार्ग रद्द करावा,अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात आली आहे.सांगलीवाडी येथे महामार्ग बाधित शेतकऱ्यांनी स्वतःच्या रक्ताने मुख्यमंत्र्यांना शक्तीपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी पत्रे लिहिले आहेत,राज्य सरकारने हा शक्तिपीठ महामार्ग रद्द करण्यासाठी तातडीने पावलं उचलावीत,आज शेतकरी आपल्या रक्ताने पत्र लिहितोय,मात्र यापुढील काळात राज्यकर्त्यांचा रक्त सांडल्याशिवाय गप्प राहणार नाही,असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेकडून यावेळी देण्यात आला आहे.

### राज्यपालांच्या उपस्थितीत रामतीर्थ सेवा समितीची गोदाआरती




दैनिक आपला विदर्भ

**नाशिक/प्रतिनिधी :** नाशिकच्या रामकुंडा वर रामतीर्थ गोदावरी सेवा समितीच्या माध्यमातून आज राज्यपाल सीपी राधाकृष्णन यांच्या उपस्थितीत गोदाआरतीचे आयोजन करण्यात आले होते.दरम्यान यावेळी समितीच्या वतीने पद्मश्री पर्यावरण तज्ञ महेश शर्मा यांना देखील राष्ट्र जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात यावेळी राष्ट्रीय महिला आयोगाचे अध्यक्षा विजया रहाटकर , कृषिमंत्री माणिकराव कोकाटे , माजी केंद्रीय राज्यमंत्री भारतीय पवार उपस्थित होते गोदावरी नदीच्या जन्मदिवशी या गोदावरी महाआरतीचे आयोजन करण्यात आले होते.

### जलसिंचन विभागाचे अधिक्षक अभियंता अभिजित म्हेत्रे यांच्या बदलीच्या मागणीसाठी पतीत पावन संघटनेच्यावतीने निषेध आंदोलन

दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** कोल्हापुरातील जलसिंचन विभागाचे अधिक्षक अभियंता अभिजित म्हेत्रे यांच्या बदलीच्या मागणीसाठी पतीत पावन संघटनेच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आलं. यावेळी जलसिंचन कार्यालयासमोर कार्यकर्त्यांनी अधिक्षक अभियंत्यांच्या विरोधात जोरदार निदर्शने करत घोषणाबाजी केली. यावेळी अधिक्षक अभियंता अभिजित म्हेत्रे यांनी राहत असलेल्या शासकीय बंगल्याच्या दुरुस्तीसाठी अनावश्यक कोट्यावधी रुपयांचा खर्च केलाय, तसंच याच कार्यालयात अनेक वर्षांपासून एकाच टेबलवर एकच अधिकारी काम करत असल्याचा आरोप पतीत पावन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केलाय.

दरम्यान या आरोपांमध्ये काहीही तथ्य नाही. नियमानुसार परवानगी घेवूनच शासकीय निवासस्थान बंगल्याची दुरुस्ती करण्यात आल्याचा खुलासा अधिक्षक अभियंता अभिजित म्हेत्रे यांनी केलायं.

### नागद रोड झोपडपट्टीतील घरांना भीषण आग; चार घरे संसारपयोगी वस्तूंसह जळून खाक

**जळगाव/प्रतिनिधी :** चाळीसगाव येथे आज नागद रोड झोपडपट्टीतील घराला शार्ट सर्किटमुळे लागलेल्या आगीचा परिणाम म्हणून शेजारील एकूण चार घरे संसारपयोगी वस्तूंसह संपूर्णपणे जळून खाक झाल्याची घटना घडली आहे.

आगीचे वृत्त समजताच चाळीसगाव नगरपालिकेच्या अग्निशामक दलांसह परिसरातील नागरिकांनी आग विझविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. मात्र आग इतकी झपाटयाने वाढत गेली की आगीने जवळपास चार घरांना होत्याचे नव्हते झालं. आग आटोक्यात आणल्यानंतर जळालेला संसार पाहून घरातील महिलांचे अश्रू अनावर झाले. संसार डोळ्या देखत जळून आगीत खाक झाले.

आतापुढे निवारा कसा होईल या विवंचनेत या कुटुंबियांची अवस्था अत्यंत दयनीय अशी होत असतांना या घटनेची माहिती घेता आगीत संसार उद्धवस्त झालेल्या कुटुंबातील सदस्य आणि नागरिकांनी या आगीचे खापर महावितरण कंपनीवर फोडतांना गेल्या महिन्यांपासून घरामध्ये कमी जास्त होणाऱ्या वीजप्रवाहामुळे घरांमधील बीज मीटर लगत स्पार्किंग होत असल्याची तक्रार महावितरण कंपनीकडे केल्या होत्या मात्र या गंभीर अश्या प्रकाराकडे महावितरण कंपनीतील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी गांभीर्यपूर्वक पाहिले नाही त्याचा परिणाम आज घरांना आग लागून संसार उद्धवस्त झाले आहे.

# सर्व रुग्णालयातील औषधांची नवीन नियमावलीप्रमाणे गुणवत्ता तपासणी- सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील सर्व आरोग्य संस्था मधील औषधाचा उपलब्ध साठा व गुणवत्ता याची नवीन नियमावलीप्रमाणे तपासणी करण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश अबिटकर यांनी दिले.

आरोग्यमंत्री श्री. आबिटकर यांनी दूरदृश्यप्रणालीद्वारे झालेल्या बैठकीत हे निर्देश दिले आहेत. जिल्हास्तरापासून राज्य स्तरापर्यंत सर्वत्र तातडीने ही मोहीम हाती घेण्यात येणार आहे.

औषधांचा पुरेसा साठा ठेवावा

राज्यातील सर्व रुग्णालयांनी आवश्यक औषधांचा पुरेसा साठा ठेवावा. औषध गुणवत्ता तपासणी मोहीम नवीन नियमावलीनुसार करावी. सर्व आरोग्य संस्थांनी खरेदी केल्यानुसार औषधाच्या नोंदी ई–औषधी प्रणालीमध्ये २४ ते ४८ तासांच्या आत घ्याव्यात, औषध साठ्याच्या समूह क्रमांकनिहाय नोंदी बिनचूक असाव्यात. खरेदी केलेल्या सर्व औषधींचे लरींलह निहाय नमुने छ–इङ प्रयोगशाळेत तपासणी करावी. कोणताही गैरप्रकार होऊ नये यासाठी पुरवठादार कंपनी व प्रयोगशाळा यांचा संपर्क होणार नाही (र्ङ्गेलश्रश इश्रळपवळपस) अशी व्यवस्था करावी. प्रत्येक औषधाचा प्रत्येक समूह क्रमांक तपासणी होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी, याकरिता त्रयस्थ छ–इङ प्रयोगशाळा, अथवा खरेदी प्राधिकरणामार्फत निर्धारित झालेल्या मानांकित प्रयोगशाळे मार्फत तपासणी करावी. औषध साठा प्राप्त झाल्यापासून तपासणी अहवाल विहित कालावधीत प्राप्त होईपर्यंत औषधसाठा स्वतंत्र ठेवण्यात यावा. अहवालानुसार प्रमाणित केलेल्या औषधांचा वापर करण्यास यावा. तसेच औषधे अप्रमाणित आढळून आल्याचा अहवाल प्रयोगशाळेने दिल्यास त्या औषधाचा तात्काळ वापर थांबवण्यात यावा या नियमावलीचे काटेकोर पालन करण्याचे निर्देश आरोग्य मंत्र्यांनी दिले आहेत.

महाराष्ट्र राज्य वैद्यकीय वस्तू खरेदी प्राधिकरणाने आरोग्य विभागांतर्गत जिल्हास्तरावरील औषध भांडाराकडून एकूण ८६ औषधी नमूने NABL प्रयोगशाळांना पाठवले होते. त्यापैकी ३२ नमुन्यांच्या अहवाल वापरण्यास योग्य असून ५४ नमुन्यांचा अहवाल प्रलंबित आहे. तसेच वैद्यकीय शिक्षण औषध भांडाराकडून मागविण्यात आलेले ६९ औषधी नमूने छ–इङ प्रयोगशाळांना पाठविण्यात आले होते. त्यापैकी १४ नमुने वापरण्यास योग्य आहेत. तसेच ५५ नमुन्यांचा अहवाल प्रलंबित असल्याची माहिती प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी दिली.

राज्यात सर्व जिल्ह्यात मिळून सन २०२३–२४ मध्ये १२ हजार ७६७ प्रकारच्या औषधांची खरेदी करण्यात आली होती. त्यापैकी १ हजार ८८४ नमुने प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठविण्यात आले असून त्यापैकी १ हजार ७७२ नमुने वापरण्यास योग्य असून ०३ नमुने वापरण्यास अयोग्य आहेत. अद्याप १०९ नमुन्याचा अहवाल अप्राप्त आहे. तसेच सन २०२४–२५ मध्ये ९ हजार ६०० प्रकारच्या औषधांची खरेदी करण्यात आली. त्यातील ४ हजार ६९१ नमुन्यांपैकी ३ हजार १७९ नमुने वापरण्यास योग्य असून ५ नमुने वापरण्यास अयोग्य आहेत. तसेच १ हजार ५०७ नमुन्यांचा अहवाल अद्याप प्रलंबित आहे. अहवालानुसार वापरण्यास अयोग्य असलेल्या लरींलहशी सर्व संबंधितांना कळविण्यात आले असून त्यांचा वापर थांबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अशी माहिती उपस्थित अधिकार्यानी यावेळी दिली.

राज्यातील आरोग्य संस्थात पुरवठा होत असलेली औषधे प्रयोगशाळेत काटेकोर तपासून घ्यावीत. तसेच रूग्णाची गैरसोय होणार नाही यासाठी आवश्यक औषधांचा पुरेसा साठा ठेवण्याचे निर्देश सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले.

## ८ फेब्रुवारीला शासकीय सेवा व योजनांचे किनवट येथे महाशिबीर; ९ फेब्रुवारीला भोकर येथील न्यायालयाच्या विस्तारीत इमारतीचे उद्घाटन

**नांदेड/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण मुंबई यांचे आदेशान्वये नांदेड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा प्रशासन नांदेड, किनवट तालुका विधी सेवासमिती व तालुका प्रशासन किनवट यांच्या संयुक्त विद्यमाने ८ फेब्रुवारी रोजी तालुका क्रिडा संकुल, किनवट जिल्हा नांदेड येथे शासकीय सेवा व योजनांचे महाशिबीर आयोजित करण्यात आले आहे. तसेच ९ फेब्रुवारीला भोकर येथील न्यायालयाच्या विस्तारीत इमारतीचे उद्घाटन न्यायमूर्ती नितीन सुर्यवंशी यांच्या हस्ते होणार आहे.

## एचआयव्ही पॉझिटिव्ह व्यक्तीकडून १७ वर्षीय मुलीचे अपहरण, १० महिने लैंगिक शोषण; इतके दिवस असा राहिला फरार

अहमदाबाद : येथे अल्पवयीन मुलीच्या अपहरणाचे एक धक्कादायक प्रकरण नुकतेच समोर आले आहे. एक १७ वर्षीय मुलगी लग्न सोहळ्यात गेली असताना अचानक गायब झाली. या मुलाचा पोलीसांकडून १० महिने कसून शोध घेण्यात आला पण ती कुठेही सापडली नाही. अखेर पोलिसांचा हा शोध ३ फेब्रुवारी रोजी एका एचआयव्हीची लागण झालेल्या व्यक्तीच्या अटकेनंतर पूर्ण झाला. पण इतके दिवस हा आरोपी पोलिसांपासून कसा लपत राहिला आणि तो सापडला का नाही? याबद्दल तपासात धक्कादायक माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मध्य प्रदेशातील एका बंद खोलीतून शहर गुन्हे शाखेच्या मानवी तस्करी विरोधी पथकाने (एएचटीयू)या मुलीची सुटका केली. आरोपीने या खोलीत पीडित मुलीला बंद करून ठेवले होते. ही अल्पवयीन मुलगी २२ मार्च २०२४ रोजी तिच्या पालकांबरोबर शाहीबाग येथे एका लग्न समारंभाला गेली होती. त्या दिवशी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास ती बेपत्ता झाली. त्यानंतर तिच्या वडीलांनी शाहीबाग पोलीस ठाण्यात अपहरणाचा गुन्हा दाखल केला.

शहराचे सहाय्यक पोलिस आयुक्त, विभाग 'एफ' यांच्या नेतृत्वाखाली तीन महिने तपास केल्यानंतरही मुलीचा ठावठिकाणा सापडला नाही. त्यानंतर पुढील तपासासाठी हे प्रकरण एएचटीयूकडे वर्ग करण्यात आले होते. तसेच पीडितेच्या वडिलांनी गुजरात उच्च न्यायालयात तातडीच्या हस्तक्षेपाची मागणी करत हेबियस कॉर्पस याचिका दाखल केली, अशी माहिती गुन्हे शाखेच्या निवेदनात देण्यात आली आहे.अनेक राज्यांमध्ये केलेल्या तपासानंतर एएचटीयू पोलिसांना मध्य प्रदेशमधील बिजोरीच्या कोटमा येथे पीडितेचा शोध लागला. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, आरोपीने सुरुवातीला पीडितेला बरेजा येथील भाड्याच्या खोलीत ठेवले होते. इतकेच नाही तर आरोपीच्या आई आणि भावाने कथित त्याला पीडितेला लपवून ठेवण्यात मदत केली. या आरोपीने मुलीला कडक बंदोबस्तात ठेवले होते आणि तिच्या जेवणावर देखील बंधनं घालण्यात आली होती असे तपासात उघड झाले आहे.

एका वकीलाकडून सल्ला घेतल्यानंतर आरोपी पीडितेला घेऊन वेगवेगळ्या शहरात फिरत राहिला. यादरम्यान तो सूरत, औरंगाबाद, बीड, हैदराबाद, नागपूर, बिलासपूर येथे गेल्याचे तपासात समोर आले आहे. दरम्यान आता आरोपीला सल्ला देणाऱ्या वकिलावर देखील कारवाई केली जाणार आहे.

जवळपास दहा महिन्यानंतर पीडित मुलगी अखेर कोटमा येथे आढळून आली, जेथे आरोपीने त्याच्या नातेवाईकांच्या मदतीने घर भाड्याने घेतले होते. पोलिसांनी सांगितले की, आरोपीने यापूर्वीही सहा मुलीचे लैगिंक शोषण केले आहे. दरम्यान त्यांना एचआयव्हीची लागण झाली आहे की नाही हे तपासण्यासाठी सातही पीडितांची वैद्यकीय तपासणी केली जाणार आहे. सध्या आरोपीला शाहीबाग पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले आहे, येथे मुलीच्या अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

## धक्कादायक! रेल्वेने प्रवास करणाऱ्या गर्भवती महिलेवर लैंगिक अत्याचार; आरडाओरडा केल्याने ट्रेनमधून बाहेर ढकललं




तिरुपत्तूर : देशभरात दररोज रेल्वेने लाखो प्रवाशी प्रवास करत असतात. खरं तर रेल्वेचा प्रवास म्हणजे सर्वसामान्यांना परवडणारा प्रवास असतो. मात्र, अनेकवेळा रेल्वेने प्रवास करत असताना अनेकदा वेगवेगळ्या घटनाही समोर येतात. आता अशाच प्रकारची एक धक्कादायक घटना तामिळनाडूमध्ये घडली आहे. तामिळनाडूच्या तिरुपत्तूरमध्ये रेल्वेत चार महिन्यांच्या गर्भवती महिलेचे लैंगिक शोषण झाल्याची धक्कादायक घटना घडली आहे. रेल्वेने प्रवास करत असलेल्या दोन तरुणांनी हे कृत्य केल्याची माहिती समोर आली आहे.

तिरुपत्तूरच्या जोलारपेट्टईजवळ ही घटना घडली. एक चार महिन्यांची गर्भवती महिला रेल्वेने प्रवास करत होती. मात्र, याच वेळी महिला प्रवास करत असलेल्या रेल्वेच्या डब्यातून आणखी दोन तरुण प्रवास करत होते. प्रवास करत असताना दोन तरुणांनी त्या गर्भवती महिलेचे लैंगिक शोषण केले. ही महिला आंध्र प्रदेशातील चित्तूरला जात होती. यावेळी शुक्रवारी पहाटे तिरुपत्तूर जिल्ह्यातील जोलारपेट्टईजवळ दोन पुरुषांनी लैंगिक अत्याचार केला.

ही महिला ट्रेनच्या वॉशरूममध्ये जात असताना दोघांनी तिला अडवलं आणि अत्याचार केला. यावेळी तिने मदतीसाठी आरडाओरडा केला असता त्या दोन तरुणांनी तिला वेल्लोर जिल्ह्यातील केव्ही कुप्पम जवळ ट्रेनमधून खाली ढकलून दिलं आहे. या घटनेमुळे तामिळनाडूत खळबळ उडाली आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

दरम्यान, या घटनेनंतर घटनेप्रकरणी पोलिसांनी एकाला ताब्यात घेतलं असल्याची माहिती समोर आली आहे. कोईम्बतूरमधील एका कपड्यांच्या कंपनीत काम करणारी ही महिला चित्तूरला जात असताना ही घटना घडली. या घटनेत या महिलेचा हात आणि पाय फ्रॅक्चर झाला आणि तिच्या डोक्याला दुखापत झाली असून तिला उपचारासाठी वेल्लोर येथील जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आलं असल्याचं वृत्तात म्हटलं आहे. पोलिसांनी या घटनेप्रकरणी गुन्हा दाखल केला असून हेमराज नावाच्या व्यक्तीला अटक केली आहे. तसेच या घटनेचा पोलीस अधिक तपास करत आहेत. तसेच इतर गुन्हेगारांची ओळख पटवण्यासाठी रेल्वे पोलीस सीसीटीव्ही तपासण्याचं काम करत आहेत.

दरम्यान, एआयएडीएमकेचे सरचिटणीस एडप्पाडी के पलानीस्वामी यांनी या घटनेचा निषेध केला आहे. द्रमुकच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारवर सडकून टीका त्यांनी केली. ते म्हणाले, ''गरोदर महिलेवर दोन पुरुषांनी लैंगिक अत्याचार केले आणि नंतर तिने ओरडण्याचा प्रयत्न केला तेव्हा तिला ट्रेनमधून ढकलून दिले ही घटना अतिशय धक्कादायक आहे. तामिळनाडूतील महिला रस्त्यावर सुरक्षितपणे चालू शकत नाहीत, शाळा, महाविद्यालये किंवा कामाच्या ठिकाणी जाऊ शकत नाहीत आणि आता ट्रेननेही प्रवास करू शकत नाहीत ही लाजिरवाणी गोष्ट आहे. अशा अत्याचारांच्या घटना म्हणजे राज्य सरकारचे अपयश असून सरकारने दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करावी'', असं एडप्पाडी के पलानीस्वामी यांनी म्हटलं आहे.

# होम लोनचा ईएमआय कमी होणार, पण कितीने? पाहा रेपो रेट कमी होताच वर्षभरात किती पैसे वाचणार

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** यंदाचं वर्ष सर्वसामान्यांना अनेक गुड न्यूज घेऊन आल्याचं चित्र दिसत आहे. याच महिन्याच्या पहिल्या तारखेला वार्षिक केंद्रीय अर्थसंकल्प सादर करताना केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी १२ लाखांपर्यंत करमुक्तीची घोषणा केली. करमुक्त उत्पन्नाची मर्यादा वाढवण्यात आल्यानंतर आता देशातील बँकांची बँक असलेल्या रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने आज मोठी घोषणा केली आहे. तब्बल पाच वर्षानंतर आरबीआयने रेपो रेटच्या दरांमध्ये कपात केली आहे. नवनियुक्त आरबीआय गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनी आर्थिक पतधोरण बैठकीनंतर ही घोषणा केली आहे.

रेपो रेटमध्ये ०.२५ टक्क्यांनी कपात करण्यात आली आहे. आता रेपो रेट ६.५० वरुन ६.२५ वर आला आहे. यामुळे सर्वसामान्यांच्या कर्जाचे हफ्ते कमी होणार असून दर महिन्याला हजारो रुपये वाचणार आहेत. अगदी गृहकर्ज असो किंवा वाहनकर्ज असो सर्वच कर्जाचा बोजा कमी होणार आहे. आजच्या आरबीआयच्या निर्णयामुळे नेमका काय फरक पडणार आहे मासिक कर्जाच्या हफ्त्यांवर ते समजून घेऊयात...

गृहकर्ज घेतलं असेल तर किती पैसे वाचणार?

कर्जाचे दर ०.२५ टक्क्यांनी कमी झाल्याने ईएमआयवर कसा परिणाम होणार किती पैसे वाचणार हे समजून घेण्यासाठी आपण २० वर्षासाठी ८.५ टक्के दराने कर्ज घेतलं आहे असं गृहित धरुन चालूयात.

तर २० वर्षासाठी ८.५ टक्के दराने २० लाख कर्ज घेतलं असेल तर आताच्या दरानुसार १७ हजार ३५६ रुपये ईएमआय भरावा लागतो. मात्र आता रेपो रेट ०.२५ टक्क्यांनी कमी झाल्यास ईएमआय १७ हजार ४१ रुपये इतका होणार आहे. म्हणजेच वर्षभरामध्ये २० लाखांच्या कर्जावर ३ हजार ७८० रुपये वाचणार आहेत.

हेच गणित ३० लाखांच्या कर्जासाठी लावलं तर आताचा २६ हजार ३५ रुपयांचा ईएमआय २५ हजार ५६२ इतका होणार आहे. म्हणजेच वर्षभरामध्ये ५ हजार ६७६ रुपये वाचणार आहेत.

५० लाख रुपयांच्या कर्जाचा विचार केला तर सध्या ४३ हजार ३९१ रुपये ईएमआय भरावा लागायचा तो आता कमी होऊन दर महिना ४२ हजार ६०३ रुपये इतका होणार आहे. म्हणजेच वर्षभरामध्ये ९ हजार ४५६ रुपये वाचणार आहेत. सविस्तर तक्ता तुम्ही खाली पाहू शकता.... (फोटो सौजन्य – झी बिझनेसवरुन साभार)




वाहन कर्ज घेतलं असेल तर किती बचत होणार?

अशाचप्रकारे ५ वर्षासाठी ९.२ टक्के दराने वाहन कर्ज घेतलं असेल तर रेपो रेट कमी झाल्याने तुमचे किती पैसे वाचणार आणि हे गणित कसं असेल ते पाहूयात...

३ लाखांच्या वाहन कर्जावर सध्या ६ हजार २५७ रुपयांचा ईएमआय भरावा लागतोय. तो कमी होऊन ६ हजार २२० रुपये इतका होईल. म्हणजेच वर्षभरात ४४४ रुपये वाचणार आहेत.

५ लाखांच्या वाहन कर्जावर आता १० हजार ४२८ रुपयांचा ईएमआय भरावा लागत होता. नव्या दरांनुसार आता हा ईएमआय कमी होऊन १० हजार ३६७ रुपयांवर येणार आहे. म्हणजेच वर्षभरात ७३२ रुपये वाचणार आहेत.

अशाच प्रकारे १० लाखांचं वाहन कर्ज घेतलं असेल तर सध्या भरावा लागणारा ईएमआय २० हजार ८५६ रुपयांवरुन कमी होऊन २० हजार ७३४ वर येणार आहे. म्हणजेच वर्षभरामध्ये १ हजार ४६४ रुपयांची बचत होणार आहे.

# जैविक कचरा आगीचे डॉक्टर्ससह औषधी विक्रेत्यांना चटके

## आरोग्य विभागाकडून चौकशी : कारवाईकडे लागले लक्ष





दैनिक आपला विदर्भ

**डोणगाव/का. प्रतिनिधी : वैद्यकीय जैविक कचरा पर्यावरण व माणव, प्राणी जीवनासाठी घातक असल्याने त्याची विल्हेवाट लावण्याचे कडक नियम आहेत. मात्र, सर्व नियमांना ठेंगा दाखवत अज्ञात व्यक्तींनी २ फेब्रुवारीच्या मध्यरात्री डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राजवळच वैद्यकीय जैविक कचरा जाळल्याची घटना घडली. त्यानंतर बुलढाणा आरोग्य विभागाच्या पथकाने ६ फेब्रुवारी रोजी पंचनामा करून डोणगाव येथील अकरा हॉस्पिटलची तपासणी केली आहे. या अहवालात आता काय घबाड बाहेर येते याकडे जनतेचे लक्ष लागलेले आहे.जैविक कचऱ्याचे आग आता हॉस्पिटलचा औषधी विक्रेत्यांपर्यंत पोहचून अधिकारी काय अहवाल देतात आणि दोषी डॉक्टरवर काय कारवाई करतात. याकडे जनतेचे लक्ष लागलेले आहे.**



डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राजवळ अज्ञात व्यक्तीने जैविक कचरा जाळला होता. यामध्ये सलाइन, बॉटल, सिरिन्ज, इंजेक्शन, व्हाईल, सोनोग्राफी रिपोर्ट, रक्ताने माखलेले कपडे, आधार कार्ड झेरॉक्स व अन्य साहित्य होते. या कचऱ्याला आग लावल्यानंतर गुरुवारी अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. रणजीत मंडाले, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. प्रशांत तांगडे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बलकार, मेहकर ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. स्वप्निल चव्हाण, डॉ. राठोड, डॉ. राम गायकवाड यांनी पाहणी करून पंचनामा केला. तसेच शहरातील अकरा हॉस्पिटलच्या हॉस्पिटलची तपासणी केली असून या तपासणी अहवालात अनेक तपासणीमध्ये अनेक संशयास्पद बाबी आढळून आल्या असल्याची चर्चा सुरू आहे. डॉक्टर वर्ग अधिकारी वर्गाशी हाताशी धरून गोरगरीब जनतेला मनमानीप्रमाणे लुटत अनेक कामे नियमबाह्य करीत असल्याचा प्रकार डोणगाव,मेहकर परिसरात सुरू असल्याची चर्चा आहे. अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षित धोरणामुळे डॉक्टरांनी मात्र, सामान्य जनतेला वेटीसी धरून त्यांची मनमानी आर्थिक लूट केली जात असल्याची चर्चाही आहे. डोणगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्राच्या इमारती जवळच जैविक कचरा टाकून जाळण्यात आल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आल्याने मेहकर डोणगाव परिसरात आरोग्य विभागाच्या नियमाला ठेंगा दाखविला जात असल्याचे दिसून येत आहे. अधिकारी कर्मचारी हे डॉक्टरांच्या कृत्याकडे जाणून-बुजून दुर्लक्ष करीत असल्याने डॉक्टरांनी डोणगाव परिसरातील डॉक्टरांनी अनेक नियमबाह्य केली जात असल्याची चर्चा आहे.जैविक कचरा प्रकरणात जिल्हा आरोग्य आरोग्य विभागाच्या वतीने डोणगाव येथील तब्बल ११ हॉस्पिटलची चौकशी केल्याचे वैद्यकीय अधिकारी राम गायकवाड यांनी सांगितले आहे त्यामुळे आता जैविक कचरा जळल्याची आग डॉक्टर्ससह औषधी विक्रेतेपर्यंत पोहोचली असून आरोग्य विभागाची टीम दोषींवर काय कारवाई करतात याकडे जनतेचे लक्ष लागलेले आहे. असून या प्रकरणात जिल्हा आरोग्य अधिकाऱ्याची टीम दोषीवर काय कारवाई करते.याकडे लक्ष लागलेले आहे. अधिकारी जिल्हा आरोग्य विभागाचे अधिकारी व पोलीस प्रशासनाचे अधिकारी या प्रकरणात गांभीर्याने कारवाई करतात की, इतर प्रकरणाप्रमाणेच सोपस्कार पूर्ण करतात. याकडे जनतेचे लक्ष लागलेले आहे...

# जिल्हा स्तरीय सीएस हॅकेथॉन स्पर्धेत पालगाव शाळा द्वितीय

दैनिक आपला विदर्भ

■ मनोज गोरे

**चंद्रपूर :** कोरपना - जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था चंद्रपूर (डायट) तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभाग चंद्रपूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हा स्तरीय सीएस हॅकेथॉन स्पर्धा एन.डी. हॉटेल, चंद्रपूर येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत जिल्ह्यातील शेकडो विद्यार्थ्यांमधून १० सर्वोत्तम शाळांची निवड करण्यात आली. या स्पर्धेत जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, पालगाव यांनी जिल्हास्तरीय सीएस हॅकेथॉन स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला.

या स्पर्धेत विद्यार्थ्यांना गंभीर विचारशक्ती, सहकार्य आणि संवाद कौशल्य या २१व्या शतकातील कौशल्यांचा वापर करून संगणकीय संहितालेखन शिकवण्यात आले. या स्पर्धेत विषय शिक्षक मंगेश साखरकर यांच्या मार्गदर्शनाखाली भौमिक शंकर धुर्वे, स्पर्श रामचंद्र खोब्रागडे आणि खुशी महेश ठावरी या तिन्ही ६ वीच्या विद्यार्थ्यांनी स्क्रॅच सॉफ्टवेअर चा वापर करून ब्लॉक संहितालेखन द्वारे पाणी वाचवा हा भ्रमणध्वनी खेळ तयार केला. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या खेळाला द्वितीय क्रमांक मिळाला आणि शाळेला भरघोस बक्षिसे मिळाली. यात एक मेघाधारित स्पर्श पडदा दूरदर्शन ,तीन मंजुषी संगणकफलक एक अलेक्सा उपकरण, एक संहितालेखन संच सह विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे आणि पदके मिळाली.

विद्यार्थ्यांनी या यशाचे श्रेय माध्यमिक शिक्षणाधिकारी राजेश पाताने, प्राथमिक शिक्षणाधिकारी अश्विनी सोनवणे, उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) विशाल देशमुख, समन्वयक रविंद्र तामगाडगे, कोरपना चे गटशिक्षणाधिकारी सचिन मालवी, केंद्रप्रमुख (बाखर्डी) सुनील कोहपरे, मुख्याध्यापिका (पालगाव शाळा) सुनिता गुंडेटी, तंत्रस्नेही शिक्षक मंगेश साखरकर,




उपक्रमशील शिक्षिका कांचन लांबट, सहायक शिक्षक संजय तोडासे, शालेय व्यवस्थापन समिती तसेच आई-वडिलांना दिले.या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# कन्नड येथील दिव्यांग बांधवांच्या आत्महत्येच्या निषेधार्थ प्रहार जनशक्ती पक्षाचे धरणे आंदोलन



दैनिक आपला विदर्भ

**अमरावती/प्रतिनिधी :** कन्नड येथे सरकारच्या उदासीन धोरणाला कंटाळून एका दिव्यांग व्यक्तीने आत्महत्या केल्याच्या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त करत प्रहार जनशक्ती पक्षाच्या वतीने अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. यावेळी सरकारच्या दिव्यांग धोरणांवर टीका करत, सरकारी योजना केवळ कागदोपत्री असल्याचा आरोप करण्यात आला.

दिव्यांग बांधवांना योजनांचा लाभ मिळवण्यासाठी शासकीय कार्यालयांमध्ये शेकडो वेळा चक्रा मारावे लागतात, मात्र तरीही त्यांना न्याय मिळत नाही, अशी भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केली. जर दिव्यांगांच्या प्रश्नांकडे लक्ष न दिल्यास अधिक तीव्र आंदोलन छेडले जाईल. दिव्यांगांच्या कल्याणासाठीच्या योजनांची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात यावी, अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

या आंदोलनात प्रहार जनशक्ती पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि दिव्यांग बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करून दिव्यांगांच्या न्यायासाठी लढण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# सहामास कार्यक्रमात वडिलांना लेकाची वैचारिक आदरांजली

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी :** लोणार तालुक्यातील चिखला काकड येथील सामाजिक कार्यकर्ते विनायक काकड यांच्या वडिलांचे निधन १७ ऑगस्ट २०२४ रोजी झाले. त्यांच्या वडिलांची वारकरी संप्रदायावर प्रचंड निष्ठा होती आणि ते तत्वनिष्ठ होते.

जिवंतपणी कधीच कुणाचे वाईट केले नाही मग त्यांच्या मरणानंतर पर्यावरणाला देखील कुठलाचं त्रास नको. माणूस गेल्यानंतर आपण रक्षा आणि अस्ति व इतर वस्तू नदीमध्ये विसर्जित करतो पण त्याचे विघटन होण्यासाठी बराच काळ लागतो व त्याचा जलचरास त्रास देखील होतो. तोच त्रास टाळण्यासाठी व पर्यावरणाला हानी करणाऱ्या रुढींना थांबवण्यासाठी मुलगा विनायक यांनी एक क्रांतिकारी निर्णय घेतला. वडिलांची रक्षा नदीमध्ये विसर्जित न करता आपल्या शेतामध्ये नेऊन त्यावर वृक्षारोपण केले.



जेणेकरून वडिलांची आठवण कायम राहील व हे वृक्ष पर्यावरणास पूरक ठरेल.

त्यानंतर वडीलांच्या सहा मास विधी व नैवद्य कार्यक्रमात देखील विनायकने अनोख्या आदर्श पद्धतीने राबविला.

स्व.जगन्नाथ काकड हे उत्तम वाचक होते व ते पर्यावरणवादी, पर्यावरणप्रेमी देखील होते त्यांना वृक्षारोपणाची प्रचंड आवड होती. आज दिवसेंदिवस वाचन चळवळ ही लोप पावत चालली आहे आणि निसर्गाचा देखील ऱ्हास होत चालला आहे. वाचन चळवळ वृंद्धिगत व्हावी व पर्यावरण रक्षणाचा छोटासा संदेश देण्याचा विनायकने प्रयत्न केला आहे. वडीलांच्या सहा मास नैवद्य कार्यक्रमात विनायकने कुठलाही अपव्यय खर्च न करता कार्यक्रमासाठी उपस्थित प्रत्येक पाहुणेमंडळी, मित्रपरिवार, आप्तेष्टांना विनायकने पुस्तकं व दुर्मिळ रोपांच्या बिया देऊन वाचनाचे व वृक्षरोपणाचे आवाहन करून वडिलांना अनोखी आदरांजली दिली आहे.

आपली वाचनाची व पर्यावरण संवर्धनाची प्रेरणा हीच माझ्या वडिलांना खरी आदरांजली असेल असेल विनायक काकड यांनी उपस्थितांना संबोधित केले आहे.

विनायक काकड हे उत्तम वक्ता व सामाजिक कार्यकर्ते देखील आहेत. अनेक सामाजिक चळवळीत



ते सक्रिय सहभागी असतात.

ते सध्या निर्मला निकेतन समाजकार्य महाविद्यालय मुंबई येथे पदवीचे शिक्षण घेत आहेत.

विनायकच्या या अनोख्या विचाराने त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

वाचन व पर्यावरण चळवळ ही प्रत्येक व्यक्तीच्या मरणोत्तर राबवावी यासाठी विनायकने समाजामध्ये प्रबोधन करण्याचा निर्धार वडिलांच्या सहामास कार्यक्रमात केला आहे.

# सोयाबीन खरेदीला एक महिना मुदत वाढ द्या; अन्यथा राहिलेले सोयाबीन मुंबईतील अरबी समुद्रात फेकून देऊ - तुपकर

**बुलढाणा/प्रतिनिधी :** अजून बऱ्याच शेतकऱ्यांचं सोयाबीन खरेदी व्हायचे बाकी आहे. राज्याचे सोयाबीनचे उत्पादन आहे ६० ते ६५ लाख मॅट्रिक टन.. सरकार फक्त १३ लाख मॅट्रिक टन सोयाबीन खरेदी करणार



आहे. त्यातील फक्त सात ते आठ लाख मॅट्रिक टन सोयाबीन खरेदी झालेला आहे. उरलेला सोयाबीन आम्ही कुठे फेकायचं. ही योजना शेतकऱ्यांसाठी आहे की व्यापाऱ्यांसाठी. हे विचारण्याची वेळ आता खऱ्या अर्थाने आलेली आहे..ज्या संस्थांची औकात नाही अशा संस्थांना खरेदीचे अधिकार दिले कसे? आचारसंहितेच्या काळात राज्याचे पणन सचिव आणि वनांचे संचालकांनी घोळ घातला. आणि ज्या संस्थांची औकात नाही त्या संस्थांना सोयाबीन खरेदी करण्याचे अधिकार दिले. यामध्ये राजकीय पक्षाच्या संस्था मोठ्या प्रमाणात आहे. सरकारकडे आमची मागणी आहे एक महिन्यापर्यंत सोयाबीनला खरेदीसाठी मुदतवाढ द्या.शेवटच्या दाण्यापर्यंत सोयाबीन खरेदी करा.अन्यथा प्रतिक्विंटल तीन हजार रुपये बोनसच्या रूपाने सोयाबीन उत्पादकांना पैसे द्या, जर हे तुमच्याकडून होत नसेल तुम्ही जेवढं सोयाबीन खरेदी केलं उरलेलं जेवढं सोयाबीन आमचा आहे.. ती सगळी सोयाबीन आम्ही मुंबईच्या अरबी समुद्रात नेऊन टाकणार आहोत.अशी प्रतिक्रिया क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी दिली आहे.